सरकार–वि–अनंता

निशाणी क्र. ०६ लगत

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ यांची साक्ष–

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

नाव – प्रभाकर श्यामरावजी भोयर,

वय – ५८ वर्ष,

धंदा – सेवानिवृत्त,

राहणार – झिंगाबाई टाकळी, नागपूर

सरतपास सरकार तर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए.एस. बिहाऊत साहेब.

१) दिनांक २८/०३/२०१७ रोजी मी पोलीस ठाणे खापरखेडा येथे कार्यरत होतो. सदर दिवशी मी इतर पोलीस सहका–यांसह मी घटनास्थळी गेलो. अरोपीच्या घरासमोर गेलो तेव्हा आरोपी दारुच्या नशेत शिवीगाळ करत होता. त्यास ताब्यात घेतले व वैद्यकीय तपासणीकरीता पाठवले. त्यानंतर अवस्थी साहेबांनी आरोपीविरुध्द प्रथम खबरी अहवाल दाखल केला. मी आरोपी अटक केली. साक्षीदारांचे बयाण नोंदविले व आरोपीविरुध्द दोषारापपत्र दाखल केले. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण.

उलट तपासणी आरोपीतर्फे श्री. पि.एम.माहेश्वरी वकिलांमार्फत.

२) हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतापासातील संपुर्ण मजकुर खोटा आहे व मी आरोपीविरुध्द खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

समक्ष

दिनांक – ०१/०३/२०२१

सावनेर

(श्रीमती रेणूका द. गायकवाड)

प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,

कोर्ट क्र. ३, सावनेर, जि. नागपूर.

सरकार–वि–अनंता

निशाणी क्र. ०६ लगत

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी खात्रीपूर्वक असे कथीत करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील साक्षपुरावा हे मुळ साक्षपुराव्या प्रतीप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – महेश ल. इंगळे